INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या आपत्ती व्यवस्थापन विषयक जाणीव जागृती उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**ज्ञानेश्वर मोहन पानसरे**

संशोधक विद्यार्थी
शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
**E-mail:** pansaredm@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2021-62828946/IRJHIS2107035

**१) प्रस्तावनाः**

आज आपत्ती व्यवस्थापन हा परवलीचा शब्द बनला आहे. अनंत काळापासून पृथ्वीतलावर आपत्ती कोसळत आहेत. वारंवार येणाऱ्या आपत्तीपैकी काही नैसर्गिक असतात तर काही मानवनिर्मित असतात, आपत्तीमुळे होणारी जिवीत वित्तहानी टाळण्यासाठी किंवा त्याचे प्रमाण कमी करण्यासाठी ‘आपत्ती व्यवस्थापनाची प्रणाली अलीकडे सगळ्याच देशानी कार्यरत केली आहे. आणि ही प्रणाली यशस्वी करण्यासाठी शालेय स्तरावर अभ्यासक्रम तसे उपक्रमातून लागू केली गेली. इ.स. १९९३ मधील लातुरचा भुंकप, १९९९ चे ओरिसातील भयंकर वादळ, २००१ चा भुजचा भुंकप तसेच २००४ च्या सुनामीचा प्रकोप अशा अनेक नैसर्गिक आपत्ती असे किंवा २५ ऑगस्ट २००३ चा मुंबई बॉम्बस्फोट, गुजरात मधील बॉम्बस्फोट, कचऱ्याचे डोंगर, तुंबली गटारे तसेच प्लेग आणि आताच उद्‌भवलेली कोरोना सारखी महामारी यातून निर्माण होणाऱ्या संकटांना एकजुटीने प्रतिकार करायला हवा.

तसेच आपत्तीवर मात करण्यासाठी लागणाऱ्या उपाययोजना संदर्भात समाजात जागृती निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न करणे गरजेचे असतात. शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असते, नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तीवेळी शाळेमध्ये सुद्धा आपली व्यवस्थापन करण्याच्या हेतूने तेथील मुख्याध्यापक सर्व शिक्षक, कर्मचारी व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना शाळेय आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व तसेच त्यांच्यामध्ये शालेय आपत्ती व्यवस्थापनाविषयी जाणीत जागृतीचा विकास होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत समस्येची निवड करण्यात आली आहे.

**२) संशोधन शिर्षकः**

माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या आपत्ती व्यवस्थापनाविषयक जाणीव जागृतीसाठी उपक्रम व त्यांची परिणामकारता अभ्यासणे.

**३) संशोधनाची गरजः**

१. नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तीवर मात करण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण असणे गरजेचे आहे.

२. नैसर्गिक तसेच मानव निर्मित आपत्ती पूर्वीच्या नियोजना संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती होण्यास शालेय आपत्ती व्यवस्थान करणे गरजेचे आहे.

३. माध्यमिक स्तवरावरील विद्यार्थी म्हणजेच कुमाराव्यस्थेतील मुलांना स्वतः आपत्ती काळात सुरक्षा करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन समजून देणे गरजेचे आहे.

**४) संशोधनाचे महत्त्वः**

१. संयुक्त राष्ट्र संधाणे सुद्धा शालेय स्तरावरील आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व जाणले आहे.

२. विद्यार्थ्यांना घराप्रमाणे किंवा आपल्या कुटुंबात जेवढी सुरक्षितता वाटते तीच सुरक्षितता शाळेतही वाटने महत्त्वाचे आहे.

३. मुलांना याविषयी योग्य ती माहिती असेल तर ते न घाबरता संकटाशी सामना करतील.

**५) संशोधनाची उद्दिष्टे:**

१. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची शालेय आपत्ती व्यवस्थापना विषयी जागरूकतेचा अभ्यास करणे.

२. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाविषयी जागृती करणे.

३. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापन व उपक्रम याविषयी जागृत करणे.

४. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन उपक्रमाची परिणामकता अभ्यासणे.

**६) कार्यात्मक व्याख्याः**

**१. माध्यमिक शाळाः**

महाराष्ट्र शासनाच्या आकृतीबंधानुसार विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी शाळा.

**२. विद्यार्थीः**

इयत्ता सहावी ते दहावी वर्गात शिक्षण घेणारी मुले आणि मुली.

**३. आपत्ती व्यवस्थापनः**

आपत्ती टाळणे, आपत्ती आल्यास सामोरे जाण्यासाठी उपाययोजना करणे व त्यासाठी आवश्यक त्या क्षमता निर्माण करणे म्हणजेच आपत्ती व्यवस्थापन होय.

**७) संशोधनाचा न्यादर्शः**

प्रस्तुत संशोधनात औरंगाबाद जिल्ह्यातील शहर भागातील सर्व माध्यमिक शाळाची संशोधनाची जनसंख्या म्हणून समावेशव केला आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने औरंगाबाद शहरातील दोन माध्यमिक शाळेतील ५० विद्यार्थ्यांची सहेतूक नमुना निवड पद्धतीने निवड केली आहे.

**८) संशोधनाची व्याप्तीः**

१. प्रस्तुत संशोधनासाठी न्यादर्शमध्ये औरंगाबाद शहरातील दोन माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

२. प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील वर्गापैकी आठवी व नववी वर्गाचा विचार केला आहे.

**९) संशोधनाची मर्यादाः**

१. प्रस्तुत संशोधनात केवळ औरंगाबाद शहरापुरता मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन केवळ २०२० या वर्षासाठीच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधनात कोरोना महामारी, भूकंप, आग लागणे, इमारत कोसळणे, अपहरण, आजारपण इत्यादी आपत्तीचाच विचार केला आहे.

**१०) संशोधन पद्धतीः**

मुख्यतः संशोधनाच्या तीन पद्धती मांडल्या जातात. त्यामध्ये ऐतिहासिक संशोधन, पद्धती, सर्वेक्षण संशोधन पद्धती व प्रायोगिक संशोधन पद्धती आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पद्धतीची निवड केली आहे.

**११) संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाहीः**

प्रस्तुत लघु संशोधनात कार्यक्षेत्र म्हणून निवडलेल्या दोन शाळेतील ५० विद्यार्थ्यांनकडून उद्दिष्टानुरूप बनविलेली प्रश्नावली भरून घेण्यात आली. प्रश्नावली ही तज्ज्ञाकडून प्रमाणित केलेली होती. त्याद्वारे शालेय आपत्ती व्यवस्थापन याविषयी मुलांमधील जागृत व जाणीव याविषयी माहिती जमा करण्यात आली. माहिती संकलित करून विश्लेषण करून अर्थनिर्वचन करण्यात आले.

**१२) माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचनः**

प्रमाणित प्रश्नावलीच्या आधारे माहितीचे संकलन करण्यात आले आणि त्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन करण्यात आले.

**१३) निष्कर्षः**

१. शालेय आपत्ती व्यवस्थापन याविषयी मुलांना सर्वात जास्त माहिती ही प्रसारमाध्यमातून प्राप्त होणे.

२. अभ्यासक्रमात याचा समावेश असल्याने शिक्षकाकडून वेळोवेळी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव व जागृती केली जाते.

३. विद्यार्थी अपहरण लैंगिक अत्याचार, महामारी या विषयी जागृत आहेत.

४. आपत्ती व्यवस्थापनात मुलांपेक्षा मुलीमध्ये आर्थिक जाणीव व जागृती दिसून आली.

**१४) शिफारशीः**

१. माध्यमिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापनावर विविध नवनवीन उपक्रम, सहशालेय कार्यक्रम याची आखणी करून ते प्रत्यक्ष राबवावे.

२. प्रत्येक माध्यमिक शाळेत धोक्याचे ठिकाणे, संकटकालीन मार्ग, सुरक्षा व्यवस्था याची माहिती सुरुवातीच्याच काळात द्यावी.

३. प्रत्येक माध्यमिक शाळेत शासनाने केलेल्या निर्देशानुसार सुरक्षा विषयक समिती स्थापन करून उपाय योजना करण्यात.

**संदर्भ सूची:**

१. डॉ. रमा भोसले, डॉ. मनिषा पाटील, सौ. जुई कुलकर्णी (२००८), आपत्ती व्यवस्थापन, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. जोशी आनंद, (२००६), शोध निबंध लेखन व विकसन, य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक

3. Indian Education Commission report (1964-66).

४. प्रा. पदमाकर सप्रे, (२०११), शैक्षणिक व्यवस्थापन नवा दृष्टिकोन, य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक